# जिल्हा परिषद नांदेड
# जाहीर प्रकटन

**माहे मार्च २०१९ व माहे ऑगस्ट २०२१ (अपंग व इतर सुधारित आरक्षणासह) महाभरती अंतर्गत अर्ज करण्यात आलेल्या उमेदवारांच्या परीक्षा शुल्काची रक्कम संबंधित उमेदवारांना परत करणेबाबत**

माहे मार्च, २०१९ व माहे ऑगस्ट, २०२१ अंतर्गत (अपंग व इतर सुधारित आरक्षणासह) महाभरती अंतर्गत ग्रामविकास विभागाच्या अखत्यारीतील जिल्हा परिषद अंतर्गत गट-क मधील १८ संवर्गाची सर्व जाहिरात, परीक्षा व संपूर्ण भरती प्रक्रिया रद् करण्यात आली असून जाहिरातीनुसार अर्ज केलेल्या उमेदवारांचे परीक्षा शुल्क परत करण्याबाबत निर्णय दिनांक २१ ऑक्टोबर २०२२ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

त्यामुळे सदर निवेदनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त परिक्षेकरिता ग्रामविकास विभागाच्या अखत्यारीतील जिल्हा परिषद अंतर्गत गट-क मधील १८ संवर्गासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांना त्यांचे परीक्षा शुल्क परत करण्याच्या अनुषंगाने https://maharddzp.com या संकेतस्थळावर लिंक उमेदवारांसाठी दि. ०५/०९/२०२३ पासून सुरू करण्यात आली आहे. सदर संकेतस्थळाची लिंक जिल्हा परिषद नांदेडच्या www.zpnanded.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

सबब, उपरोक्त भरती प्रक्रिये अंतर्गत नांदेड जिल्हा परिषदच्या आस्थापनेवरील गट- क मधील विविध संवर्गासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांनी सदरील परीक्षा शुल्कापोटी भरणा केलेली रक्कम परत प्राप्त होण्याच्या अनुषंगाने https://maharddzp.com या संकेतस्थळावर जावून आपल्या बँक खात्याचा अचूक तपशील काळजीपूर्वक नोंदवावा जेणेकरुन संपुर्ण रक्कम प्रदान करण्याची कार्यवाही करणे सोईचे होईल.

दिनांक - १३/०९/२०२३
स्थळ - नांदेड

स्वाक्षरीत/-
**(राजकुमार मुक्कावार)**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)**
**जिल्हा परिषद नांदेड**

स्वाक्षरीत/-
**(मिनल करनवाल, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद नांदेड**